**प्रेसनोट** **दिनांक ३०/०३/२०१९**

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे

## हाता मध्ये तलवार घेवुन लोकांमध्ये दहशत निर्माण करणारा रोहन अशोक गायकवाड रा.लोहगांव पुणे यास अटक

दिनांक १७/०३/२०१९ रोजी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथील तपास पथकाचे प्रभारी अधिकारी श्री पिंगळे त्यांचेकडील पोलीस स्टाफ राहुल मोरे, संजय आढारी, विशाल गाडे, विष्णु गोणे, विनोद महाजन, यांचेसह कलवड वस्ती भागामध्ये पायी पेट्रोलिंग करीत असताना दुपारी १४/२५ वा.चे सुमारास कलवड वस्ती सय्यद अफसर शाळेसमोरील रोडवर पुणे येथे रोहन अशोक गायकवाड वय २२ वर्षे रा. कलवडी वस्ती लोहगांव पुणे याने त्याचे स्वतःचे कब्जामध्ये बेकादेशिररित्या अनाधिकाराने विनापरवाना लोखंडी तलवार बाळगुन ती अंधाधुंद फिरवुन तेथील वस्तीमधील लोकांमध्ये दहशत निर्माण करीत असताना मिळुन आल्याने त्यास पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे व त्यांचे वरील नमुद पोलीस स्टाफ यांनी ताब्यात घेतले आहे, तसेच सदरचे इसमाने मा. सह पोलीस आयुक्त साो (का. व सु.) पुणे शहर यांचे कार्यालयीन जा.क्रं.१८७३/२०१९ दिनांक ५/०३/२०१९ रोजी अन्वये दिनांक ९/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०१ वाजले पासुन ते दिनांक २२/०३/२०१९ रोजी रात्रौ २४/०० वा.पर्यंत आपले कब्जात शस्त्रे, सोटे, तलवारी,भाले, बंदुका जेणे करुन शरीरास इजा करण्यासाठी वापरता येईल अशी घातक हत्यार जवळ बाळगण्यास बंदी असताना त्या आदेशाचा भंग करुन आरोपी रोहन अशोक गायकवाड वय २२ वर्षे रा. सर्व्हे नं.२४७ फाळके दुकानाजवळ, कलवडी वस्ती लोहगांव पुणे याने आपले कब्जात लोखंडी तलवार बाळगुन ती अंधाधुंद फिरवुन तेथील वस्तीमधील लोकांमध्ये दहशत निर्माण करीत असताना मिळुन आल्याने त्याचेविरुध्द राहुल आत्माराम मोरे पोलीस नाईक विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे फिर्याद दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि नंबर १३९/२०१९ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला असुन पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे यांनी आरोपीचे ताब्यातील किं रुपये ५००/- ची लोखंडी तलवार दोन पंचासमक्ष जप्त केलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहे. पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे व त्यांचे वरील नमुद पोलीस स्टाफ यांनी ही उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

(राजेंद्र पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर.